# जनसंपर्क विभाग

जळगाव – दि.१६ (प्रतिनिधी) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे झालेल्या आविष्कार संशोधन स्पर्धेत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सोपान वांगरे यांना औषध निर्माण व वैद्यकीय विषयातील पदव्युत्तर पदवी गटात प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले आहे.

दि. १२ ते १५ जानेवारी या काळात झालेल्या या संशोधन स्पर्धेत विद्यापीठाच्या ४८ विद्यार्थ्यांचा संघ सहभागी झाला होता. प्राथमिक फेरीतून २० विद्यार्थी पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनच्या पुढील फेरीसाठी निवडले गेले होते. त्यापैकी पदव्युत्तर पदवी गटात औषध निर्माण व वैद्यकीय विषयात सोपान नांगरे (एच.आर. पटेल फार्मा., शिरपूर) यांना प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले. ते शिरपूरच्या एच.आर. पटेल फार्मा. इन्स्टिटयुटमध्ये संशोधन सहायक म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या या यशाबद्दल कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे यांनी अभिनंदन केले आहे. संघासोबत डॉ. जयदीप साळी, डॉ. विकास गीते, डॉ. प्रिती सोनी हे गेले होते.

## बातमी नं. २

जळगाव – दि.१६ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या पर्यावरण व भूशास्त्र प्रशाळेत शनिवारी भुगोल दिवस साजरा करण्यात आला. प्रा. सी.डी. देशपांडे यांचा जन्मदिवस भुगोल दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. शनिवार, दि. १४ जानेवारीला सुर्य धनु राशीतून मकर राशी मध्ये संक्रमण होते, म्हणून या दिवसाचे विशेष महत्व आहे. पर्यावरण व भूशास्त्र प्रशाळेत भुगोल दिवसाचे औचित्य साधून निबंध स्पर्धा व भित्ती पत्रक स्पर्धा आयोजित करण्यात आली अशी माहिती विभागप्रमुख डॉ. व्ही.एम. रोकडे यांनी दिली.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: १६ जानेवारी, २०२३

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी